जुलै 2016 | ₹40 | पृष्ठ संख्या 40 | पुणे, वर्ष 6 | अंक 07

# अर्थपूर्ण

आर्थिक साक्षरता +
पारदर्शकता =
स्वाभिमानी भारत




## SOLUTION TO EVERYTIHING

# MADE IN INDIA

संपादक
यमाजी मालकर

सहसंपादक
सम्राट शिरवळकर

व्यवस्थापक
अशोक तुळपुळे

संपर्क : editor.arthapurna@gmail.com, 9860580147

'अर्थपूर्ण' पब्लिकेशन्स प्रा. लि.
11, 'हर्षदा', रामबाग कॉलनी,
पौड रोड, पुणे 411038
फोन : 020-25430540,
www.arthapurna.org

# अर्थपूर्ण

जुलै 2016

वर्ष सहावे
अंक सातवा

**डिझाईन**
ऑफबीट कॉन्सेप्टस्, पुणे.
9881098010

**व्यवस्थापन साहाय्य**
महेंद्र बनसोडे

**वार्षिक वर्गणी व टपालासंबंधी**
व्यवहारासाठी संपर्क
**020-25430540**
**9921926538**
arthapurna.monthly@gmail.com

**जाहिरात संपर्क**
अर्चना जोशी
9552591874

'अर्थपूर्ण'मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या साहित्य आणि विचारांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

'अर्थपूर्ण' हे मासिक मालक, अर्थपूर्ण पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्याकरिता मुद्रक व प्रकाशक यमाजी मालकर यांनी विक्रम प्रिंटर्स प्रा. लि. 31, 34 पर्वती इंडस्ट्रीयल इस्टेट, पुणे-सातारा रस्ता, पुणे ९ येथे छापून ए-702, साम्राज्य, शिवतीर्थनगर, पौड रस्ता, पुणे 411038 (सुतारदरा बसथांब्याजवळ) येथे प्रसिद्ध केले.
संपादक : यमाजी मालकर

## अनुक्रमणिका

06 मोदींचा'कर'नामा म्हणजेच BTT...यमाजी मालकर
09 हेही आपल्याच देशात घडते आहे...!...भारतीय
11 राष्ट्रीय योजनांत 'कॉसमॉस बँक' नेहमीच आघाडीवर
13 अर्थभान
18 How to resolve tax disputes...John Magu, Keniya
20 Solution...Made in India...Ahmad Javed, Pakistan
22 लघू कालावधीत दिला उत्तम परतावा...प्रशांत बने
23 बात पते कि... प्रसाद भागवत
25 अर्थक्रांती!...जयश्री खाडिलकर-पांडे
26 Cash For Votes & Arthakranti...Rajan Menon
30 अर्थक्रांती न्यूज
34 ...आता अर्थक्रांतीच वाचवेल...सदाभाऊ खोत
36 अर्थपूर्ण जगण्यासाठीची एक अनोखी चळवळ ...भारतीय

# भूमिका



**यमाजी मालकर**
ymalkar@gmail.com

# मोदींचा 'कर'नामा म्हणजेच BTT

**चांगल्या करसंकलनासाठी पंतप्रधान RAPID चा मार्ग सांगतात, 'अर्थक्रांती'ने जो बँक व्यवहार कराचा (BTT) मार्ग सांगितला तो मोदी यांच्या या करनाम्यात 100 टक्के बसणारा आहे. अडथळा एकच आहे, तो म्हणजे त्यासाठी राजकीय धाडस करावे लागणार आहे. आपले प्रश्न आपण आपल्या पद्धतीने सोडवू शकतो, यावर विश्वास ठेवून 'अर्थक्रांती'च्याच मार्गाने पुढे जावे लागेल. त्याचा उच्चार करण्यासाठी सरकार जो वेळ घेते आहे, त्यामुळे सध्याची परिस्थिती आणखी चिघळण्याचा धोका आहे.**

देशासमोरील गुंतागुंतीचे प्रश्न सोडविण्याचा आणि करसंकलनाचा इतका जवळचा संबंध आहे, असे पूर्वी कोणी सांगितले असते तर त्यावर कोणी विश्वास ठेवला नसता, पण आता घटनाच अशा घडत आहेत की करपद्धतीचा उल्लेख केल्याशिवाय पुढे जाता येत नाही, हे स्पष्ट झाले आहे. ज्यांच्याकडे पैसा येतो आहे, त्यांनी त्यातील विशिष्ट वाटा देशाच्या तिजोरीत टाकल्याशिवाय देश चालू शकत नाही. त्यामुळेच देशात मोठा बदल करण्याचे स्वप्न दाखविणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनाही करसंकलनाविषयी बोलण्याची वेळ आली आहे. आपण दाखविलेले 'अच्छे दिन' चे स्वप्न पूर्ण करावयाचे असेल तर आज असलेला 17 लाख कोटी रुपयांचा महसूल पुरेसा नाही, हे मोदी यांना चांगले माहीत आहे. महसूल म्हणजे करांच्या माध्यमातून सरकारला मिळणारे उत्पन्न. कर किती चांगल्या पद्धतीने घेतले जातात आणि त्याचा विनियोग किती चांगल्या पद्धतीने केला जातो, यावर सरकारची कार्यक्षमता मोजली जाते. त्यामुळे स्वीडनसारख्या आणि इतर युरोपीय देशांत करांचे प्रमाण जीडीपीच्या 40 ते 50 टक्के इतके असूनही तेथे लोक आनंदाने कर देतात. भारतासारख्या विकसनशील देशांत हेच प्रमाण 15 टक्क्यांच्या घरात असूनही कर जनतेला जाचक वाटतात, हेही पंतप्रधानांना चांगले माहीत आहे.

करपद्धती सुलभ करण्याचे आश्वासन मोदी यांनी निवडणुकीत दिले आहे. नितीन गडकरी आणि सुब्रमण्यम स्वामी यांनी तर दिल्लीत पत्रकार परिषद घेऊन प्राप्तिकर कसा रद्द होऊ शकतो, हे सांगितले होते. **(पत्रकार परिषदेचा रिपोर्ट पान क्रं. 8 वर पहा)** पण गेली दोन वर्षे त्या दिशेने फार काही झालेले नाही. सरकारी पातळीवर त्याची चर्चा चालू असल्याचे संकेत येतात खरे, पण व्यवहारात त्यातले काही अजून उतरलेले दिसत नाही. गेल्या महिन्यात कर प्रशासनातील सर्व उच्च अधिकाऱ्यांच्या दोन दिवसांच्या 'राजस्व ज्ञान संगम'चे उद्घाटन करताना मोदी यांनी भारताच्या या दुखण्यावर बोट ठेवले, त्याचे कारण हे सर्व व्यवहारात उतरण्याची गरज निर्माण झाली, हे आहे. भारतीय नागरिक कर भरण्यास तयार आहे, मात्र त्यांच्यावर विश्वास दाखविला पाहिजे आणि करअधिकाऱ्याने त्याचे सल्लागार बनले पाहिजे, हे मोदी यांचे म्हणणे शंभर टक्के बरोबर आहे. पण एकीकडे करवसुलीचे उद्दिष्ट्य वाढविण्याची गरज, दुसरीकडे विविध नावे बदलून घेतले जाणारे किमान 32 प्रकारचे कर, तिसरीकडे चलनवाढीने परेशान झालेले करदाते, चौथीकडे करांच्या किचकटपणामुळे वाढलेला जाच अशा स्थितीत कर देणारे आणि कर घेणारे यांच्या नात्यात विश्वास कसा निर्माण होणार? हे कमी आहे म्हणून की काय, पण प्रत्यक्ष करांची वसुली होत नाही म्हणून अप्रत्यक्ष करांचे प्रमाण अधिक असलेला आपला देश. अशा पद्धतीत देशातील गरिबांचा जास्त जाच होतो, हे साऱ्या जगाने मान्य केले आहे. यातून मार्ग कसा काढायचा, याच्या अर्ध्या उत्तराचे सूतोवाचही मोदींनी केले. प्रत्यक्ष कर देणारे 131 कोटींत आज फक्त 5.4 कोटी नागरिक आहेत, त्यांची संख्या 10 कोटी म्हणजे दुप्पट झाली पाहिजे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. करदाते वाढले पाहिजे, असे थोडक्यात त्यांना म्हणायचे

आहे. पण त्यात नवीन काही नाही. ते कसे वाढेल, हे त्यांनी सांगायला हवे होते. मोदी यांनी 10 कोटी म्हटले की नुसतेच करदाते वाढले पाहिजे, असे म्हटले, यावरून संदिग्धता आहे,कारण या परिषदेत माध्यमांना प्रवेश नव्हता.पण ते तेवढे महत्वाचे नाही. आश्चर्य म्हणजे अधिकाऱ्यांनी करदात्यांच्या सल्लागाराची भूमिका बजवावी, या पंतप्रधानांच्या विधानाला दोन दिवस होत नाहीत की कर न भरणाऱ्यांना कसे तुरुंगात टाकले पाहिजे किंवा त्यांचे पॅन कार्ड सील केले पाहिजे, अशाही बातम्या प्रसिद्ध होत आहेत. याचा अर्थ करसंकलन वाढत नाही, यावरून सरकार अस्वस्थ आहे, एवढाच होतो.

करवसुली हे आपल्या देशात किती मोठे दुखणे आहे, हे आता वेगळे सांगण्याची गरज राहिलेली नाही. पुण्यासारख्या शहरांत कर न भरणाऱ्या आस्थापनांच्या समोर बँडबाजा वाजविला जातो तर औरंगाबादसारख्या महापालिकेत मालमत्ता कराच्या वसुलीसाठी पोलिसांची मदत घ्यावी लागते! केवळ जकातवसुलीसाठी महाराष्ट्रात करण्यात आलेल्या छोट्या महापालिकांवर कर्मचाऱ्यांचे पगार करण्यासाठी कर्ज काढण्याची नामुष्की आली आहे. देशातील श्रीमंतीचे आकडे एकीकडे फुगत चालले असताना गल्लीपासून दिल्लीपर्यंतचा कारभार वर्षानुवर्षे कर्ज काढून चालला आहे. केंद्राकडे येणाऱ्या एका रुपयातील 19 पैसे परकीय कर्ज फेडण्यात जातात. राज्य सरकारे आणि स्थानिक स्वराज्य संस्थांची तीच अवस्था आहे. त्यामुळेच कर कोणी आणि किती घ्यायचा, याविषयीचे वाद विकोपाला चालले आहेत. प्रचंड गाजावाजा करून येत असलेल्या जीएसटीचे गाडे त्यावरूनच अडले आहे. विशिष्ट कर वसूल केल्याशिवाय सरकारे चालू शकत नसल्याने सर्व खात्यांना उद्दिष्ट्ये दिली जातात आणि त्यानुसार करवसुली केल्याने 'करांचा दहशतवाद' तयार झाला आहे, हे विरोधी पक्ष म्हणून भाजपचे म्हणणे होते आणि ते बरोबरच आहे. पण ते बदलण्यासाठी आज तुम्ही काय करत आहात, हा प्रश्न तर विचारला जाणारच. मोदी म्हणतात तसे भारतीय माणूस मुळात खूप चांगला आहे, हे तर खरेच आहे. व्यवस्थेने त्याला गांजले आहे. त्यामुळे व्यवस्था चांगली करणे, ही आजची खरी गरज आहे. कररचनेच्या बाबतीत व्यवस्था कशी चांगली होईल, हे 'RAPID' च्या माध्यमातून त्यांनी सांगितले. याचा अर्थ Accountability, Probity, Information and Digitization हे कर प्रशासनाचा पाया झाला पाहिजे, असे त्यांचे म्हणणे.

प्रत्यक्ष करांत 92 टक्के हे आगाऊ म्हणजे आपोआप तिजोरीत येऊन पडतात, मग प्राप्तिकर विभागाचे 42 हजार अधिकारी कर्मचारी नेमके काय करतात, असा मार्मिक प्रश्नही मोदी यांनी उपस्थित केला. भारतात करवसुलीसाठी होणारा अमाप खर्च हा वादाचा विषय आहे. तेवढा खर्च करून




तिजोरी भरली असती तर ते समजण्यासारखे आहे, पण तेही होत नाही. कारण कर भरण्यापेक्षा तो कसा वाचविता येईल, याचा विचार भारतीय नागरिक जास्त करताना दिसतात. मोदींनी त्यासाठी गुगलचा आधार का घेतला, हे कळण्यास मार्ग नाही. पण सरकार आर्थिकदृष्ट्या सक्षम झाल्याशिवाय ते भेदभावमुक्त, कार्यक्षम आणि प्रभावापासून दूर असे प्रशासन देऊ शकत नाही, यासाठी आता पुराव्यांची गरज राहिलेली नाही.

पंतप्रधान RAPIDचा मार्ग सांगतात, त्याचे स्वागतच आहे. 'अर्थक्रांती'ने जो बँक व्यवहार कराचा (BTT) मार्ग सांगितला तो मोदी यांच्या करनाम्यात 100 टक्के बसणारा आहे. अडथळा एकच आहे, तो म्हणजे त्यासाठी राजकीय धाडस करावे लागणार आहे. जे पारंपरिक मार्ग कुचकामी झाले आहेत, ते बाद करावे लागतील. सतत जगाची री ओढण्याची जी आपल्या अर्थपंडितांना सवय लागली आहे, ती मोडावी लागेल. आपले प्रश्न आपण आपल्या पद्धतीने सोडवू शकतो, यावर विश्वास ठेवून अर्थक्रांतीच्याच मार्गाने पुढे जावे लागेल. त्याचा उच्चार करण्यासाठी सरकार जो वेळ घेते आहे, त्यामुळे सध्याची परिस्थिती आणखी चिघळण्याचा धोका आहे. तो पत्करायचा की करांच्या दहशतवादातून जनतेची सुटका करायची, हे आज सरकारने ठरवायचे आहे. सरकारने त्याबाबत कचखाऊ भूमिका घेतली तर, जनता ते ठरविल्याशिवाय राहणार नाही.